

**Dr. Ashish Davalbhakta**
**M.B.B.S, MS Gen. Surgery, MCh (Plastic Surgery), FRCS (Glasgow)**
**Phone : 9881311122**
**E-mail ID : ashish@aestheticsindia.org**

# केशारोपण

केस हा मानवी शरीराचा अतिशय महत्त्वाचा भाग मानला जातो. स्त्री व पुरुषांना केस गळणे किंवा टक्कल पडणे यांसारख्या केसांशी निगडीत समस्यांमुळे अनेकदा लाजिरवाणे वाटते. या समस्यांमुळे स्वतःवरचा विश्वास कमी होऊ लागतो. त्याचप्रमाणे अकाली वृद्धत्व आल्याची भावना देखील भेडसावते. या समस्यांचा अनेक लोकांना मानसिक त्रास होतो. या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी सौंदर्यशस्त्रक्रियेचा पर्याय अनेक लोकांकडून निवडला जातो.

- **केस कशामुळे गळतात?**

स्त्री व पुरुषामध्ये होणाऱ्या सर्वसाधारण केस गळतीला 'ॲन्ड्रोजेनेटीक ॲलोपेशिया' असे म्हणतात. हार्मोन्सच्या असंतुलनाने तसेच काही अनुवंशिक घटकांमुळे केस कमी होणे किंवा टक्कल पडणे, यांसारख्या केसांशी निगडीत समस्या उद्भवतात. जास्त ताप येणे, मोठ्या प्रमाणात जंतुसंसर्ग होणे, काही विशिष्ट औषधांचे सेवन करणे, गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर, थॉयरॉईडचा आजार, प्रसूती तसेच कॅन्सरसाठीचे उपचार यांसारखी विविध कारणे देखील क्वचित् प्रसंगी केसगळतीला कारणीभूत ठरु शकतात.

पुरुषांमधे टक्कलाची सुरुवात भांग फाकणे, केस गळणे यांसारख्या समस्यांपासून होते. कालांतराने कायमचे टक्कल पडते. स्त्रियांमध्ये भांगामुळे तेथील केसांची घनता हळुहळू कमी होते व नंतर टक्कल पडते. एखाद्या व्यक्तीला टक्कल किती प्रमाणात पडेल, याचे जरी भाकीत करणे अवघड असले तरीही अनुवंशिक घटकांचा विचार करुन व टक्कल पडण्यास कधी सुरवात झाली इत्यादींचा विचार करुन टक्कल किती प्रमाणात पडेल याचा अंदाज लागू शकतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- **केस गळत असतील तर काय केले पाहिजे?**

केस नियमितपणे गळत असतील तर सौंदर्यशल्यविशारद (Aesthetic plastic surgeon) किंवा सौंदर्यतज्ञ (Cosmetologist) यांचा योग्य सल्ला घेऊन केसगळतीमागचे नेमके कारण जाणून घेतले पाहिजे. योग्य तपासणी करुन तज्ञ तुम्हाला औषधांचा किंवा शस्त्रक्रियेचा योग्य सल्ला देतील. या दोन्ही उपचारपद्धतींचे फायदे व तोटे देखील ते तुम्हाला समजून सांगू शकतील.

- **केसगळतीच्या उपचारासाठी कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत?**

जर केस गळती कमी प्रमाणात होत असेल तर फक्त औषधे घेऊन देखील त्यावर उपचार घेतले जाऊ शकतात. या औषधांच्या जोडीला प्रगत शस्त्रक्रियेचाही वापर केला जाऊ शकतो. सध्या 'मायक्रो फॉलीक्युलर हेअर ग्रॉफ्टींग' ही उपचारद्धती अधिक प्रचलीत आहे. ज्या लोकांना टक्कल आहे तसेच ज्यांचे केस पातळ झाले आहेत, अशा लोकांसाठी या उपचारपद्धतीचा वापर करुन केलेले केशारोपण अधिक नैसर्गिक वाटते.

- **केशारोपण पद्धती शरीराच्या कुठल्या भागांसाठी (अवयवांसाठी) वापरली जाऊ शकते?**

या उपचारपद्धतीचा वापर डोक्यावरील त्वचा, भुवई, पापणी, दाढी, मिशा, कानाच्या येथील दाढी (sideburns) इत्यादी ठिकाणच्या केस वाढीसाठी केला जाऊ शकतो.

- **उपचारासाठी पहिल्यांदा गेल्यावर डॉक्टर कोणती माहिती विचारु शकतात?**

प्रथम डॉक्टर तुमची जीवनशैली, आरोग्य, पूर्वी असलेले आजार किंवा पूर्वी झालेल्या शस्त्रक्रिया इत्यादींशी निगडीत प्रश्न विचारतील. तसेच आधीचे तुमचे फोटो किंवा कुटुंबाचे फोटो पाहून अनुवांशिक घटकांची माहिती देखील घेतील. तुमच्या केसांची गुणवत्ता तपासली जाईल. तसेच उपचारांची योग्य दिशा ठरवण्यासाठी काही तपासण्या (Tests) करायला देखील सांगितल्या जातील. उपचाराचे फायदे व तोटे याविषयी देखील ते तुम्हाला माहिती देतील.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- **मायक्रो हेअर ट्रान्सप्लान्ट म्हणजे काय?**

काही उपचारपद्धतीनंतर केसांची वाढ विरळ होते. जे अनैसर्गिक वाटते. परंतु मायक्रोहेअर ट्रान्सप्लान्ट या उपचारपद्धतीमध्ये केसाची एकेक बट असलेली त्वचा दुसऱ्या ठिकाणी लावली जाते. त्यामुळे या पद्धतीने केलेले केशारोपण अधिक नैसर्गिक व घनदाट वाटते.

- **शस्त्रक्रियेदरम्यान काय केले जाते?**

या शस्त्रक्रियेमध्ये केस असलेली त्वचा शरीराच्या एका भागापासून दुसऱ्या भागी लावली जाते. अशी छोटे केस असलेली त्वचा हळूवारपणे काढली जाते व नंतर ती टक्कल पडलेल्या जागी लावली जाते. हे करताना ज्या पद्धतीने केसांची वाढ हवी त्या पद्धतीने ती होईल अशा प्रकारे त्वचा लावली जाते. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेद्वारे १५०० - २००० केसांचे रोपण नव्याने करता येऊ शकते.

- **शस्त्रक्रियेनंतर कोणत्या प्रकारचे बदल दिसून येतात?**

शस्त्रक्रियेनंतर ज्या ठिकाणी केशारोपण केले आहे, त्या भागावर संरक्षणासाठी पट्टी लावली जाते. बहुतेक लोकांना शस्त्रक्रियेनंतर फारसा त्रास होत नाही. थोड्या प्रमाणात त्रास होत असल्यास पेनकीलर घेऊन आराम वाटतो.

शस्त्रक्रियेनंतर कधीकधी थोड्या प्रमाणात खाज येण्याची अथवा सूज येण्याची शक्यता असते. शस्त्रक्रियेनंतर साधारणतः सात दिवसांनी पट्टी काढली जाते. कृत्रिमरीत्या रोपण केलेले केस २ आठवड्यात गळून पडतात. ही केस गळती पाहून निराश होऊ नये. कारण त्याच ठिकाणी पुढील तीन महिन्यांत नव्याने केस येण्यास सुरवात होते. अशा प्रकारे नवीन केस आल्यावर केसांची घनता वाढविण्यासाठी उपचार केले जातात. बहुतेक लोकांना यासाठी २-३ वेळा उपचार घेण्याची गरज असते.

- **केशारोपण शस्त्रक्रियेचे धोके आहेत का?**

अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेचे फार गंभीर दुष्परिणाम नाहीत. ज्या भागावर केस असलेली त्वचा लावली जाते तिथे रक्तस्त्राव होण्याची शक्यता असते. परंतु योग्य उपचार घेतल्यास ही शक्यता देखील फेटाळता येते. तसेच ज्या भागावरील केस असलेली त्वचा रोपणासाठी काढली जाते, ती भरुन यायला देखील कदाचित वेळ लागू शकतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

- **कोणत्या व्यक्ती या उपचारपद्धतीचा लाभ घेऊ शकतात?**

केशारोपणासाठी कुठलीही वयाची अट नाही.फक्त त्या व्यक्तीने नैसर्गिकरीत्या केस येण्याचा आशादायी दृष्टीकोन ठेवावा.अशा प्रकारच्या उपचारांची सुरुवात संपूर्ण टक्कल पडल्यावर न करता लवकरात लवकर करावी, जेणेकरुन नैसर्गिक व घनदाट केसांच्या वाढीचा अनुभव तुम्हाला घेता येईल.

- **सौंदर्यशास्त्राचा कसा फायदा होतो?**

केसगळतीच्या समस्येचा सर्वांगाने विचार करण्यासाठी सौंदर्यतज्ञांची मदत होते. सौंदर्यशास्त्रातील वेगवेगळी तज्ञ मंडळी रुग्णाच्या गरजेनुसार उपचाराला एकत्रित सल्ला देतात. तसेच ते एकत्रितपणे रुग्णाच्या शस्त्रक्रियेनंतरच्या परिणामांवर लक्ष ठेवून रुग्णाला हवे ते परिणाम (Results) अनुभवण्याचा आनंद देतात.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*